# नि.दि.मु.क्र.२१/२०२० मधील निशाणी क्र.७० वरील आदेश
# (CNRNO.MHSI090001282020)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादींचा जबाब वाचला . उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. प्रस्तूतच्या अर्जान्वये अर्जदार यांनी मयत वादी रामचंद्र शंकर ठुकरुल यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे . दप्तरी दाखल असलेल्या मृत्यूपत्रान्वये वादी रामचंद्र ठुकरुल हे दि .२६/०७/२०२२ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तूत अर्ज हा मुदतीत असल्याने सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. अर्जदार यांच्या कथनानुसार वादी अ ते क हेच मयत रामचंद्र यांचे वारस आहेत. दाव्याचे स्वरुप बघता दाव्याचे कारण अबाधित राहत असल्याने व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २२ ची व्याप्ती लक्षात घेता अर्ज मंजूर करणे न्यायसंगत वाटते. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

## – आदेश –

०१. निशाणी क्र. ७० वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
०२. वादी रामचंद्र यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करुन दुरूस्ती प्रत पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी दाखल करावी.
०३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

सही/-

स्थळ : देवगड (एस.बी.वाळके)

दिनांक : १७/०९/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.